# विद्याधन महाविद्यालयात विवेकानंद व जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली



शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या विद्याधन महाविद्यालय वलवाडी येथे स्वामी विवेकानंद व जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. शारदा पाटील यांनी स्वामी विवेकानंद हे एक युगपुरुषहोऊन गेले. त्यांनी आपल्या जीवनात कमी कालावधीत युवकांना प्रेरणा जागृत निर्माण केली. आज ही त्यांच्या विचारांच्या आधारे तरुणांनी त्यांची प्रतिमा जरी पाहिली तरी त्यांच्या नेतृत्वाचीव कार्याची स्मृतीनिर्माणहोते. आजच्या युवकांना आव्हान आहे की त्यांनी विवेकानंद चरित्र पूर्ण समजून घ्यावे म्हणजे भावी पिढी दिशाहीन होणार नाही. धर्माच्या सखोल अभ्यासाचे जनक म्हणूनत्यांच्या कार्याचे महत्त्व आहे. त्यासोबत आज जिजाऊ जयंती देखील आहे. जिजाऊंनी जनतेचा राजा शिवाजी महाराज निर्माण केले. रयतेला सुखीआणि समृद्धकसे करता येईल याची शिकवण रुजवली गड किल्ले जिंकण्याचे प्रशिक्षण दिले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ. योगेश बोरसे यांनी केले, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणेम्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. पी. एफ. पाटील यांनी देखील मनोगत व्यक्त केले. जर विवेकानंदांची भक्ती केली तर तरुणांना शक्ती प्राप्त होईल. याप्रसंगी अध्यक्षा सौ शारदा पाटील प्राचार्य डॉ. ए.एस.बागुल प्रा. डॉ.योगेश बोरसे प्रा. सोनाली मोरे प्रा. प्रफुल्ल पवार प्रा सौ ललिता निकम प्रा पुनम पाटील शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.







